सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०८ | सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. अरुण सोनटक्के**
शिक्षक, पत्रकार, कवी



**श्री. जीवन पवार**
सामाजिक कार्यकर्ते



**श्री. किरण शेटे**
केटरर्स



**श्री. अरुण नेरकर**
होमगार्ड दलप्रमुख



*अमळनेर : येथील प्रतिपंढरपूर समजल्या जाणाऱ्या श्री संत सद्गुरू सखाराम महाराज यात्रोत्सवाचा अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर रविवारी सकाळी प्रारंभ करताना प. पू. संतश्री प्रसाद महाराज. शेजारी आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, विश्वस्त ॲड. रवींद्र देशमुख व विविध क्षेत्रातील मान्यवर.*

# श्री संत सखाराम महाराज यात्रोत्सवाचा प्रारंभ

## अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर विधिवत स्तंभारोपण आणि ध्वजारोहण

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : येथील प्रतिपंढरपूर समजल्या जाणाऱ्या श्री संत सद्गुरू सखाराम महाराज यात्रोत्सवास रविवार, दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता परंपरेप्रमाणे अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर 'संतश्री संखाराम महाराज की जय'च्या घोषात आणि विविध वाद्यांच्या गजरात, अतिशय भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला. या यात्रोत्सवाला सुमारे २५० वर्षांची परंपरा आहे. यात्रोत्सव सुमारे १५ दिवस चालतो. यामध्ये रथोत्सव व पालखी सोहळा हे मुख्य उत्सव असतात. ह. भ.प. मोहन महाराज बेलापूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने यात्रोत्सवाची सांगता होते. पालखीच्या दिवशी साक्षात पांडुरंग अर्थात विठ्ठल संतश्री सखाराम महाराजांच्या यात्रोत्सवात असतात, अशी अख्यायिका आहे. यात्रोत्सवात बोरी नदीपात्रात पाळणे, खेळणी, संसारोपयोगी वस्तू आणि खाद्यपदार्थांची अनेक दुकाने थाटली जातात. अमळनेरसह राज्यातील व परराज्यातील लाखो भाविक या यात्रोत्सवात सहभागी होत असतात. खानदेशातील ही सर्वांत शेवटची आणि मोठी यात्रा मानली जाते.**

प. पू. संतश्री प्रसाद महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी वाडी संस्थानात आयोजित या कार्यक्रमाप्रसंगी आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, विश्वस्त ॲड. रवींद्र देशमुख माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी, पालिकेतील गटनेते पंकज चौधरी, नगरसेवक दादा पवार, महेश देशमुख, राजू फापोरेकर, अनिल महाजन, श्रीराम चौधरी, गुलाब पाटील, सुयोग धनगर, पंकज भोई, कैलास पाटील, दीपक चौगुले, बाळासाहेब संदानशिव, जालंधर चौधरी, रामकृष्ण पाटील, शिवसेनेचे संजय कौतिक पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष विनोद कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पिंगळे, खानदेश शिक्षण मंडळाचे संचालक हरी भिका वाणी, संचालिका सौ. वसुंधराताई लांडगे, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, वाडी संस्थानचे विश्वस्त रविकांत देशमुख, व्यवस्थापक रमेश जोशी, उदय देशपांडे, काँग्रेसचे सुभाष पाटील, संदीप घोरपडे, माजी नगरसेवक प्रताप शिंपी, विक्रांत पाटील, सूरज परदेशी, डॉ. अनिल शिंदे, प्रा. डॉ. प्रभाकर जोशी, पत्रकार जितेंद्र ठाकूर आदींसह विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी, पाठशाळेचे विद्यार्थी, भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरूवातीला वाडी मंदिरातील प्रमुख देवता राधिका माता, रुक्मिणी माता व हनुमानजींचे प. पू. संतश्री प्रसाद महाराज यांच्यासह सर्व उपस्थित मान्यवरांनी दर्शन घेतले. त्यानंतर टाळ-मृदुंग यांच्या साथसंगतीने वारकरी पाठशाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागाने बोरी नदीपात्रातील श्री संत सद्गुरू सखाराम महाराज यांच्या समाधीस्थळाजवळ विधिवत मंत्रोपचार आणि पूजा-अर्चा करून स्तंभ व ध्वज यांचे महानुभवांच्या उपस्थितीत पूजन झाले. त्यानंतर 'संतश्री सखाराम महाराज की जय'चा घोष करीत समाधीस्थळासमोर स्तंभारोपणासह ध्वजारोहण करण्यात येऊन संतश्री प्रसाद महाराज यांनी आजपासून श्री संत सद्गुरू सखाराम महाराजांच्या वार्षिक यात्रोत्सव-२०२६ चा प्रारंभ झाल्याचे जाहीर केले. हा यात्रोत्सव खानदेशसह राज्यातील सर्व भाविक-भक्तांनी उत्साहपूर्ण व भक्तीमय वातावरणात साजरा करण्याचे आवाहन केले. त्यानंतर उत्सवांतर्गत होणाऱ्या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका उपस्थित सर्वांना वितरीत करण्यात आली. त्यानंतर संतश्री प्रसाद महाराज यांच्या हस्ते उपस्थितांना प्रसाद वाटप होऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.

पान २ वर



*स्तंभारोपणासह ध्वजारोहणप्रसंगी विधिवत मंत्रोपचारासह पूजा-अर्चा करताना मुख्य पुरोहित केशव पुराणिक व त्यांचे सहकारी.*

### 'संध्येतील चोवीस नामांचा महिमा'चे प्रकाशन

याप्रसंगी प्रा. डॉ. प्रभाकर जोशी यांनी लेखन केलेल्या व पुण्यातील धार्मिक प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या 'संत नामदेवकृत संध्येतील चोवीस नामांचा महिमा' या भगवान श्रीविष्णूंच्या चोवीस नावांचे माहात्म्य अभंग व भावार्थासह स्पष्टीकरण दिलेल्या पुस्तकाचे तसेच 'प्रखर जनसंवाद' या मासिकाचे प. पू. संतश्री प्रसाद महाराज यांच्या शुभ हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.

### रथोत्सवांतर्गत होणारे कार्यक्रम

- अक्षय्य तृतीया, रविवार, दि. १९ एप्रिल ते रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ पर्यंत दररोज सकाळी ९ ते दुपारी १२
  **श्री संत तुकाराम महाराज गाथा भजन :** नेतृत्व - ह.भ.प. शारंगधर, वाघ, पंढरी, सुदाम, दिलीप, शिवाजी या बुवा व वारकरी शिक्षण पाठशाळेतील विद्यार्थी, अमळनेर.
- शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८.३० ते १०.३० ह.भ.प. प्रल्हाद महाराज (चौथे गादीपती) यांच्या पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प. जयदेव बुवा गुरव यांचे कीर्तन.
- रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता ह.भ.प. मोहन महाराज बेलापूरकर यांच्यासह दिंडीचे आगमन. रात्री ८.३० ते ९.३० दिंडीचे कीर्तन.
- मोहिनी एकादशी, सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता.
  **रथोत्सव :** विविध कला प्रदर्शन, आदिवासी सांस्कृतिक कला मंडळ, माळीवाडा, ता. बागलाण, जि. नाशिक, सुरेश अहिरे आणि मंडळ.
- गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ७ श्री संत सद्गुरू सखाराम महाराज पुण्यतिथी (प्रमुख दिवस) निमित्त सर्वरोग निदान शिबिर-स्थळ : भक्त निवास, वाडी चौक, अमळनेर.
- शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी सकाळी ६ वाजता.
  **पालखी मिरवणूक :** साथसंगत-बॅण्ड पथक, भुसावळ तसेच सायंकाळी ५ वाजेपासून श्री सद्गुरू ब्रास बॅण्ड पथक, चाळीसगाव.
- शनिवार, दि. २ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२. ह.भ.प. मोहन महाराज बेलापूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

### उन्हाळ्यात हेल्दी राहायचे? खा हे १० सुपरफूड्स!

हीटवेव्हपासून बचावासाठी योग्य आहार खूप महत्त्वाचा आहे. **टरबूज :** नैसर्गिक कूलर यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते, शरीर हायड्रेट ठेवते. शरीराला थंडावा देते. **काकडी :** काकडी शरीराला थंडावा देते आणि पचन सुधारते. याचा वापर सॅलेड स्वरूपात करू शकता. **दही :** पोटासाठी सुपरफूड आहे. हे एक नैसर्गिक प्रोबायोटिक आहे. जे पचन चांगले ठेवते. शरीर थंड राहते. **नारळ पाणी :** नारळ पाणी शरीरासाठी नैसर्गिक इलेक्ट्रोलाइटचे काम करते. यामुळे घामाने गेलेले मिनरल्स ते भरून काढते. **ताक :** ताक हे हलके आणि पचायला सोपे असते. उन्हाळ्यात पोट थंड ठेवण्यासाठी रोज प्यायल्यास खूप फायदेशीर. **हिरव्या पालेभाज्या :** हिरव्या पालेभाज्या पोषणाचा खजिना आहेत. शरीराला आवश्यक व्हिटॅमिन्स देतात. **सिट्रस फळे :** लिंबू, संत्रे, मोसंबी सारखी फळे व्हिटॅमिन सी ने समृद्ध असतात. जे इम्युनिटी वाढवतात. शरीर फ्रेश ठेवतात. **बेरी :** स्ट्रॉबेरी आणि ब्लूबेरीसारखी फळे अँटीऑक्सिडंट्सने भरपूर असतात. ही फळे शरीराला ताजेतवाने आणि सक्रिय ठेवण्यास मदत करतात.

## भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ

# मासिक जनजागराचा सांगता समारोह संपन्न

### अक्षय्य तृतीयेचा साधला शुभ मुहूर्त; विविध महानुभवांसह शेतकऱ्यांची उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात रविवार, दि. १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर भूमी सुपोषण अभियान या राष्ट्रीय चळवळीचा मासिक जनजागराचा सांगता समारोह अतिशय भक्तीमय आणि चैतन्यमय वातावरणात विधिवतरीत्या संपन्न झाला. वर्षप्रतिपदा अर्थात गुढीपाडवा रोजी अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १९ मार्च रोजी या जनजागराचा प्रारंभ झाला होता.

केंद्रीय कृषीमंत्री मा. ना. शिवराजसिंहजी चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य समारंभपूर्वक झाला होता. वर्षप्रतिपदा ते अक्षय्य तृतीया असा या मासिक जनजागराचा कार्यकाल होता. तो १९ एप्रिल रोजी संपला. मात्र यानंतरही भूमी सुपोषण चळवळ सतत सुरूच राहणार आहे.

दरम्यान, या सांगता सोहळ्याप्रसंगी प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, कृषिभूषण सौ. राजश्रीताई राजेश पाटील (हिंगोणा, ता. अमळनेर, जि. जळगाव), पोलीसपाटील विश्वास महाजन, माजी उपसरपंच पुंजू पाटील (शिरूड, ता. अमळनेर, जि. जळगाव), महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे योगेश वंजारी, दिनेश पाटील, दीपक चौधरी, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त डी. ए. सोनवणे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, मंगल सेवेकरी अनिल कदम, आर. टी. पाटील, व्ही. व्ही. कुलकर्णी यांच्यासह अमळनेरसह परिसरातील विविध खेड्यांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरूवातीला विविध गावांतील शेतकऱ्यांनी आणलेली एक मूठ माती कलशात एकत्रित करण्यात आली. त्यानंतर त्या जागेचे मंडल तयार करून ती जागा मंत्रोपचाराच्या माध्यमातून शुद्ध करण्यात आली. मंडलाच्या जागेत सर्व माती एकत्रित करून विविध मान्यवर व शेतकऱ्यांच्या साक्षीने आचमन, प्राणायाम, गणपती बाप्पांचे स्मरण, प्रधान संकल्प करून गणपती बाप्पांचे विधिवत पूजन करण्यात येऊन भूमी अभिमंत्रण विधी करण्यात आला. त्यानंतर उपस्थित सर्वांना अभिमंत्रित केलेली माती पाकिटात टाकून ती सर्व शेतकऱ्यांसह उपस्थितांना आपापल्या शेतांत टाकण्यासाठी देण्यात आली. याचवेळी शेतकऱ्यांना शेतजमिनीचा पोत सुधारण्यासह ती सुजलाम्-सुफलाम् करण्यासंदर्भात माहिती देण्यात आली. भूमी सुपोषणाचा संदेश सर्वदूर पोहचविण्याचे सर्वांना आवाहन अक्षयकृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्यामार्फत करण्यात आले. श्री मंगळग्रह मंदिराचे पुरोहित शुभम वैष्णव, जयेंद्र वैद्य व गणेश जोशी यांनी पौरोहित्य केले. त्यांना सेवेकरी उमेश पाठक, अमोल र. पाटील, पदमसिंग पाटील यांनी सहकार्य केले.



*अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात रविवारी अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ मासिक जनजागर भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी उपस्थित प्रांताधिकारी भंगाळे, तहसीलदार सुराणा, कृषी विभागाचे वंजारी, पाटील, चौधरी यांच्यासह शेतकरी व मंगळग्रह सेवा संस्थेचे पदाधिकारी.*

## संपादकीय

### सात्त्विक दान देणारी अक्षय्य तृतीया!

समाजजीवनाचा प्रवाह विचार आणि संस्कारांनी सतत समृद्ध राहावा याच व्यापक उद्देशाने भारतीय संस्कृतीने आपला विस्तार केलेला आहे. निसर्गाचे सृष्टीचक्र असेल, कालचक्र असेल याच्या गतीने किंवा कालमानाप्रमाणे केवळ दिवस, महिने, वर्ष, आयुष्य व्यतीत करणे एवढाच रूक्ष विचार न करता निसर्गामध्येच अतिशय उत्स्फूर्तपणे घडून येणारे बदल हे मनुष्याच्या मनाचा, हृदयाचा, एवढेच नव्हे तर शरीराचादेखील ठाव घेतात. म्हणजेच सृष्टी ज्याला निसर्ग म्हटले जाते आणि समष्टी म्हणजे त्याला समाज म्हटले जाते. या दोघांच्याही समन्वयातून सुख, समृद्धी, आनंद मिळवणे, वेगवेगळ्या कारणांनी निर्माण होणाऱ्या समस्या, संकटे, आव्हाने किंवा दुःखावर मात करण्याची मानसिकतादेखील विकसित करण्याची कल्पकता भारतीय संस्कृतीतच पाहायला मिळते. चैत्र महिन्यात वसंत ऋतू सुरू होतो. येणाऱ्या रणरणत्या उन्हापूर्वीच सृष्टीचा बराच भाग हिरव्या कोवळ्या पालवीने फुलून जातो. वर्षारंभाची ही निसर्गाची नवी सुरूवात मनाला उल्हासित करते. निराशा झटकून उल्हास वाढवते. चैत्र प्रतिपदा म्हणजेच पाडवा. साडेतीन मुहूर्तपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त आणि पाठोपाठ अक्षय्य तृतीया येते. भारतासारख्या या कृषिप्रधान देशात पाणी, माती, शेती, याबद्दलची जाणीव ठेवून कृतीशील राहण्याची प्रेरणा अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने दिली जाते. जी सृष्टी किंवा शेती भरभरून अन्नधान्य देते. त्या मातीचा कलश किंवा घट पाण्याने भरून त्याची पूजा करण्याचा आणि तो दान देण्याचा विचार मांडला गेला. तो कृतीत उतरविण्यासाठीच या घटाचे दान देण्याचा संस्कारही रुजवला गेला. पुराणातील कथेनुसार श्रीकृष्णांनी अर्जुनाला असा उपदेश केला होता, की या दिवशी कोणत्याही स्वरूपाचे दिले जाणारे दान हे अधिक फलदायक किंवा पुण्यकारक आहे. किंबहुना आपल्याकडे असलेल्या गोष्टींपैकी कोणतीही वस्तू इतरांना देण्याची प्रवृत्ती ही समाज म्हणून साहाय्यभूत ठरते आणि सांस्कृतिकदृष्ट्या संस्कार म्हणून तितकीच मोलाची ठरते. म्हणून या दिवशी सोने, चांदी, घर, जमीन या गोष्टी खरेदी करण्याला जसे महत्त्व आहे. तसेच आपल्याकडे असलेल्या वस्तू दिल्याने आपल्याकडची संपत्ती अक्षय्य रूपात टिकून राहण्याची एक श्रद्धा विकसित झाली.

अक्षय्य म्हणजे कधीही न संपणारे असा त्याचा अर्थ गृहित धरल्यानंतर मग या दिवशी केली जाणारी ईश्वराची आराधनासुद्धा अक्षय्य स्वरूपाचीच ठरते. मग असेच दान नियमितपणे करता यावे म्हणून खरेदी केली जाणारी नवनवीन संपत्ती किंवा वस्तूदेखील याच दानाच्या सवयीसाठी गरजेच्या ठरतात. साडेतीन मुहूर्तपैकी एक मुहूर्त असल्याने सर्व प्रकारच्या गोष्टींसाठी तो शुभयोग मानला गेलेला आहे. सण म्हणून अक्षय्य तृतीयेचे महत्त्व मान्य करीत असताना त्या निमित्ताने जपला गेलेला विचार हा अधिक अक्षय्य किंवा चिरंतन स्वरूपाचा ठरतो. मनुष्याचा किंवा समाजाच्या वृत्ती प्रवृत्ती लक्षात घेतल्या तर स्वार्थीपणा ठायीठायी दिसून येतो. परंतु मनुष्यजीवनाचा आनंद उपभोगताना सामाजिक स्तरावरचे हे आदान प्रदानाचे व्यवहार अधिक समाधान देणारे ठरतात. म्हणजेच या अक्षय्य तृतीयेच्या मूळ उद्देशाचा विचार करताना व्यक्ती किंवा समाजामध्ये समाधानाची वृत्ती अक्षय्य टिकून राहावी असाच विचार संस्काररूपातून दृढ केला गेला. एरवी कधीही माती किंवा पाण्याविषयी आपण फार विचार करत नाही. पण त्या मातीतून बनवलेला कुंभ किंवा घट हा वैशाखाच्या रणरणत्या उन्हात तहान भागवणारा ठरतो. त्यातून केले जाणारे जलदान हे देणाऱ्याला तर समाधान देतेच. परंतु घेणाऱ्यालासुद्धा आपण संतुष्ट झाल्याचे भाव निर्माण करून जाते. माती किंवा पाण्यासारखी खऱ्या अर्थाने ही विपुल संपत्ती आहे. त्या संपत्तीचे घट आणि जलरूपात केले जाणारे दान म्हणजे माती आणि पाण्याविषयी व्यक्त झालेला नम्रभावसुद्धा ठरतो. कोणतीही किंमत न मोजता जी माती व्यक्ती समाजाचे पालनपोषण करते, पाण्याला तर जीवनच म्हटले गेलेले आहे. या दोन्ही गोष्टींविषयीचा आदरभाव व्यक्त करण्याचेसुद्धा अक्षय्य तृतीया हे निमित्त मानले पाहिजे.

सृष्टीमध्ये माती आणि पाणी या दोन्ही गोष्टी अक्षय्य स्वरूपातच आहेत. म्हणजे या कधीही क्षय पावत नाहीत त्यांची होणारी पूजा, आराधना दानाच्या स्वरूपामध्ये प्रस्थापित करणे यामागे असलेली उदात्तता ही फक्त भारतीय संस्कृतीमधूनच अनुभवता येते. अन्यथा एक सणासारखा सण, पूजेचे कर्मकांड आणि गोडाधोडाचे खाणे एवढ्यापुरता त्याचा मर्यादित अर्थ राहू शकला असता. परंतु अतिशय छोट्या छोट्या कृतीमध्ये संस्कृतीचे रहस्य दडवून ठेवण्याची अलौकिकता समजून घेतली पाहिजे. आनंद, सुख, समाधान या गोष्टी कितीही पैसा असला तरी विकत घेता येऊ शकत नाहीत. उन्हाळ्यात पाण्याचे महत्त्व लक्षात येते आणि म्हणूनच या दिवसापासून ठिकठिकाणी पाणपोई सुरू केल्या जातात. कोकणामध्ये शेतीच्या मशागतीलादेखील याच दिवसापासून सुरूवात होते. परशुरामाची जयंती असल्याने पुरुषार्थ आणि समाजासाठीच उपयुक्त ठरणारा पराक्रम याचाही संदेश परशुराम जयंतीच्यानिमित्ताने दिला जातो. निमित्त आणि औचित्य यांचा हा समन्वय जीवन जगण्याच्या प्रेरणा ठरत आलेल्या आहेत. समृद्धता ही विचार, संस्कार आणि त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतून अनुभवता येते.

# समता, बंधुता आणि सामाजिक पुनरुत्थानाचे महानायक

**महात्मा बसवेश्वर महाराज जयंती विशेष**

*ग्लोबल महातेज वृत्तसेवा*

महात्मा बसवेश्वर महाराज (इ. स. ११३१ मध्ये जन्म) हे १२ व्या शतकातील एक महान संत, दार्शनिक, कवी आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावात एका प्रतिष्ठित वीरशैव कुटुंबात अक्षय्य तृतीयेला झाला. त्यांच्या आईचे नाव मादलंबिका आणि वडिलांचे नाव मादिराज होते. ते बालपणापासूनच विचारशील, चिंतनशील आणि समाजातील अनिष्ट प्रथांविरुद्ध सजग वृत्तीचे होते. समाजविरोधी परिस्थितीचा प्रतिकार त्यांच्या काळात समाजातील रूढी, कर्मकांड, जातीभेद, वर्णभेद आणि स्त्री-पुरुष विषमतेचा प्रचंड प्रभाव होता. बालपणापासूनच बसवेश्वरांनी अशा विषमतेविरुद्ध प्रश्न विचारणे सुरू केले. त्यांनी तरुण वयातच उपनयन संस्कारास नकार देऊन तत्कालीन परंपरावादी धर्मपरंपरेचा खुला विरोध केला. यामुळेच त्यांचे वय कमी असताना अनेकांना त्यांच्या विचारांनी आकर्षित केले. अनुभव मंटप लोकशाहीचे प्राचीन मंदिर महात्मा बसवेश्वर महाराजांनी 'अनुभव मंटप' या नावाचे एक सार्वजनिक विचार मंच स्थापन केले. जे जगातील पहिल्या प्रकारचे लोकशाही आधारित लोकांचे चर्चासत्र होते. येथे भिन्न जाती, लिंग, व्यवसाय आणि सामाजिक स्तरातील लोक येऊन वैचारिक, आध्यात्मिक आणि सामाजिक विषयांवर मुक्तपणे संवाद साधत होते. या चर्चांमधून तयार झालेल्या विचारांनी पुढे वचन साहित्य या रूपात समाजात प्रबोधन पसरले. समता आणि सामाजिक बंधुत्वाचा संदेश



बसवेश्वर महाराजांनी समता, बंधुता आणि न्याय या तिन्ही मूल्यांचे समर्थन केले. त्यांनी श्रमाला मानवी प्रतिष्ठेचे स्थान दिले आणि हेतुपुरते शब्दात सांगितले की श्रम हा कायाक वे कैलास कर्म हेच उपासना आहे. त्यांच्या शिकवणीत धर्म आणि समानतेचे हे तत्त्व जगभर प्रसिद्ध झाले. स्त्री-पुरुष समानता आणि विवाह व्यवस्थेत परिवर्तन महात्मा बसवेश्वर महाराजांनी स्त्रियांना सामाजिक व धार्मिक क्षेत्रात समान अधिकार देण्यास प्राधान्य दिले. त्यांनी स्त्रियांना अनुभव मंटपात सहभागी होण्याचा हक्क दिला, जे त्या काळातील समाजातील एक मोठा क्रांतिकारक बदल होता. त्याशिवाय, त्यांनी काही वेळा आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले, ज्याने मनुवादी सामाजिक व्यवस्थेला आव्हान दिले.

**धार्मिक दृष्टिकोन**

बसवेश्वर महाराज हे निर्गुण, निराकार एकेश्वरवादी तत्त्वज्ञानाचे समर्थक होते. त्यांनी जातिव्यवस्था आणि अंधश्रद्धा यांचे निराकरण करण्यासाठी आपल्या वचन साहित्यातून धार्मिक विचारांचा प्रचार केला. त्यांच्या शिकवणीत दानधर्मापेक्षा दासोह (सेवा)ला अधिक महत्त्व दिले गेले, आणि कर्मकांडाच्या पलीकडे नैतिक, सामाजिक मूल्यांचे भान ठेवण्याचा आग्रह केला.

**वचन साहित्य**

त्यांनी कन्नड भाषेत वचन साहित्य तयार केले, ज्यात साध्या आणि प्रभावी शब्दांतून जीवन, समाज आणि अध्यात्म यांचे तत्त्वज्ञान व्यक्त केले गेले. या वचनांनी साध्या जनतेपर्यंत त्यांच्या विचारांचा प्रसार सहज केला आणि समाजाबद्दल जागृती निर्माण केली.

**आजचा प्रभाव आणि वारसा**

आजही महात्मा बसवेश्वर महाराजांचे विचार भारतीय समाजातील समता, सामाजिक न्याय, समानता आणि मानवतावाद यांचे मूर्त प्रतीक आहेत. त्यांच्या जन्मदिवसाला बसवेश्वर जयंती म्हणून उत्साहाने साजरा केले जाते आणि विविध ठिकाणी त्यांच्या पुतळ्यांचे निर्माण, स्मरण आणि कार्यक्रम आयोजित केले जातात. महात्मा बसवेश्वर महाराज हे १२ व्या शतकातील एक अद्वितीय समाजसुधारक, दार्शनिक आणि नैतिक विचारांचे प्रवाही स्त्रोत होते. त्यांनी आपल्या मूल्यांमधून समाजातील विषमता, अंधश्रद्धा आणि अन्यायाच्या विरोधात दृढपणे संघर्ष केला. त्यांच्या शिकवणी आजच्या काळातही समानतेचे, बंधुत्वाचे आणि मानवतेचे आदर्श म्हणून प्रेरणा देतात. ▲

# मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिराचा ५५ जणांनी घेतला लाभ

## शस्त्रक्रियेसाठी ३० रुग्ण पात्र; मंगळग्रह सेवा संस्थेचा उपक्रम

*ग्लोबल महातेज वृत्तसेवा*

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था, मा. ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाऊंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाऊंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्यातर्फे रविवार, दि. १९ एप्रिल रोजी श्री मंगळग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराचा ५५ रुग्णांनी लाभ घेतला. पैकी ३० रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. सोमवार, दि. २० एप्रिल रोजी श्री मंगळग्रह मंदिर येथून विशेष वाहनाने आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) येथे शस्त्रक्रियेसाठी त्यांना रवाना करण्यात येणार आहे.

या शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांनी सहभाग नोंदविला. डॉ. राहुल चौधरी, डॉ गुरुपितसिंग राठोड, विजय बामणे, अनिल मुंडे, समृद्धी साळवी यांनी रुग्णांची तपासणी केली.



*अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे आयोजित मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिरांतर्गत रविवारी तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी.*

मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम यांनी मार्गदर्शनात शिबिराची माहिती दिली. यावेळी उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, अनिल कदम, प्रमोद पाटील, नितेश बारी, मयूर चौधरी आदींनी सहकार्य केले. दरम्यान, सदर शिबिर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी श्री मंगळग्रह मंदिर येथे नियमितपणे होते, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे आवाहन करण्यात आले आहे. ▲

# बस-पिकअपची धडक; सर्व प्रवासी सुखरूप

## गलवाडे-जैतपीर दरम्यान घटना; पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा

*ग्लोबल महातेज वृत्तसेवा*

अमळनेर : तालुक्यातील गलवाडे ते जैतपीर गावांदरम्यान एसटी बस व पिकअप व्हॅन यांच्यात धडक होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यात कोणालाही दुखापत झाली नाही. दरम्यान, या घटनेबाबत पिकअपचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंद्रकांत मोतीलाल पटेल (चालक, शिदखेडा आगार) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी प्रवासी घेऊन जळगावहून शिंदखेड्याकडे बस नेत होतो. सकाळी सव्वाआठच्या सुमारास जैतपीर




*अमळनेर : गलवाडे ते जैतपीर दरम्यान एसटी बस-पिकअप व्हॅन यांच्यात झालेली धडक.*

(ता. अमळनेर) शिवारातील गलवाडे गावाच्या पुढे हनुमानजींच्या मदिराजवळ समोरून येणारी पांढऱ्या रंगाची महेंद्र पिकअप व्हॅन ( एमएच ०४- एचएस ००६१) वरील चालक विश्वास भरत पाटील (रा. माळपिंपरी) याने भरधाव वेगाने समोरून येऊन चालकाच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यानंतर मी व वाहक तसेच प्रवासी बसच्या खाली उतरून पाहणी करताना तेथे गावातील इतर लोक जमा झाले. यावेळी कोणालाही दुखापत झाली नसल्याचे दिसून आले. एसटी बसची पाहणी केली असता बसच्या चालकाकडील पुढील बंफरला तसेच हेडलाईटजवळ व पत्रा दबला गेल्याचे दिसून आले. तसेच पिकअप व्हॅनचे बंफर व इंजिनचे नुकसान झाले आहे. या घटनेचा पुढील तपास हवालदार संजय सूर्यवंशी करीत आहेत. ▲

# आखाजीचे औचित्य साधून शेतकऱ्यांकडून जागर

## भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळीबद्दलचे जाणून घेतले महत्त्व

*ग्लोबल महातेज वृत्तसेवा*

अमळनेर : अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या भूमी सुपोषण अभियान राष्ट्रीय चळवळ जनजागर रथाचे तालुक्यातील ठिकठिकाणी उत्स्फूर्तपणे स्वागत केले जात आहे. अक्षय्य तृतीया अर्थात आखाजीचे औचित्य साधून रविवार, दि. १९ एप्रिल रोजी तालुक्यातील देवगाव-देवळी, धुपे, नगाव, गडखांब, पातोंडा, दापोरी, सावखेडा, गंगापुरी, खापरखेडा, रुंधाटी, मडगव्हाण, धावडे या गावांतील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे जनजागर रथाद्वारे ध्वनिक्षेपकाद्वारे दिल्या जाणाऱ्या माहितीचे तोंडभरून कौतुक केले.

रासायनिक खते, कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे भूमीमातेवर आघात होत आहे. हा आघात दूर करून सेंद्रिय पद्धतीने शेती करीत भरघोस उत्पादन घेऊन पिढ्यान्‌पिढ्या सुरू असलेल्या सुदृढ आरोग्याचे महत्त्व लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्या अनुषंगाने जनजागर रथातून दिल्या जाणाऱ्या पॉम्लेटचे महत्त्व शेतकऱ्यांना सांगण्यात आले. या माहितीचेही शेतकऱ्यांनी संयुक्तपणे वाचन करून अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर भूमी सुपोषणाचा संकल्प करीत इतरांनाही याचे महत्त्व पटवून देण्याचे सूचित केले. गावोगावी जाणाऱ्या या जनजागर रथासह महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनही सेंद्रिय शेतीसंदर्भात शेतकऱ्यांना माहिती दिली जात असल्याने त्यांना भूमी सुपोषणाचे महत्त्व आता पटू लागले आहे. ▲




*अमळनेर : अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर रविवारी भूमी सुपोषणाचा उद्देश, महत्त्व व कार्य समजावून घेताना शेतकरी.*

# श्री संत सखाराम महाराज यात्रोत्सवाचा प्रारंभ

पान १ वरून

**विशेष कार्यक्रम**

**※ सोमवार, दि. २६ एप्रिल २०२६**

सकाळी ९ ते ११ : ह.भ.प. शारंगधर बुवा देशमुख यांची वारकरी कीर्तन सेवा.
११ ते दुपारी १ : ह.भ.प. गणेशजी रामदासी, छ. संभाजीनगर यांची रामदास संप्रदायातील नारदीय कीर्तन सेवा.
२ ते ३.३० : ह.भ.प. डॉ. प्रज्ञाताई देशपांडे, पळसोदकर यांचे दासगणू महाराज यांच्या परंपरेतील नारदीय कीर्तन सेवा.३.३० ते सायंकाळी ५ : सौ. अनिताताई पद्माकर जोशी, छ. संभाजीनगर यांची नारदीय कीर्तन सेवा.

**※ मंगळवार, दि. २८ एप्रिल ते गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६**

दरम्यान दररोज दुपारी ३ ते ४ : ह.भ.प. गोविंद भगवानराव लोटांगणे महाराज यांचे भजन.
तत्पूर्वी- सकाळी ९ ते ११ : ह.भ.प. डॉ. प्रज्ञाताई देशपांडे, पळसोदकर यांचे दासगणू महाराज यांच्या परंपरेतील नारदीय कीर्तन सेवा.
११ ते दुपारी १ : ह.भ. प. गणेशजी रामदासी, छ. संभाजीनगर यांची रामदास संप्रदायातील नारदीय कीर्तन सेवा.
४ ते सायंकाळी ६ : सौ. अनिताताई जोशी, छ. संभाजीनगर यांची नारदीय कीर्तन सेवा.
६.३० ते रात्री ८.३० : 'सूर नवा-ध्यास नवा' कलर्स मराठी टीव्ही फेम, आंतरराष्ट्रीय यूथ फेस्टिव्हल सुवर्णपदक विजेते ह.भ. प. हर्षद किसन गोळे, सिन्नर यांचा अभंगरंग हा कार्यक्रम.

**※ बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६**

सकाळी ९ ते ११.३० : गुरुदत्त भजनी मंडळ, सखाराम महाराज संस्थान, अमळनेर व सुरभी म्युझिकल ग्रुप (प्रस्तुतकर्ता-अजिंक्य इनामदार, अकोला)
११.३० ते दुपारी १ : ह.भ.प. कुलभूषण मुरलीधर मोहरीर, अमळनेर यांची नारदीय कीर्तन सेवा (मुंबई)
४ ते सायंकाळी ६ : ह.भ.प. डॉ. प्रज्ञाताई देशपांडे, पळसोदकर यांचे दासगणू महाराज यांच्या परंपरेतील नारदीय कीर्तन सेवा.
५ ते ७ : श्री. सागर कुळकर्णी व ग्रुप, नाशिक यांचा 'अभंग यात्रा' सुमधुर गायनाचा कार्यक्रम.
७ ते रात्री ९ : ह.भ.प. गणेशजी रामदासी, छ. संभाजीनगर यांची रामदास संप्रदायातील नारदीय कीर्तन सेवा.

**※ गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६**

सकाळी ९ ते ११.३० : ह.भ.प. गणेशजी रामदासी, छ. संभाजीनगर यांचे रामदास संप्रदायातील नारदीय कीर्तन सेवा.
११.३० ते दुपारी २ : सखा माऊली भजनी मंडळ, छ. संभाजीनगर यांचा भारूड व संगीत भजन कार्यक्रम. ४ ते ५.३० : डॉ. केदार कुळकर्णी यांचे म्युझिक थेरपी प्रस्तुत रागातून संगीतोपचार-नादातून आरोग्याकडे कार्यक्रम (कु. मधुरा कुळकर्णी, सौ. मेघन कुळकर्णी आणि सहकारी) ५.३० ते ७ : ह.भ.प. कुलभूषण मुरलीधर मोहरीर, अमळनेर यांची नारदीय कीर्तन सेवा (मुंबई). रात्री ९.३० ते ११ : गुरुदत्त भजनी मंडळ यांचे गुरुवार नित्य सेवा भजन कार्यक्रम. ११ नंतर : मौजे आठेगाव, बनशेंद्रा, चापानेर, हतनूर, कन्नड, बोरसर, चिकलठाणा व बोलठाणा दत्तभक्त मंडळ यांचा दत्तपूर्णार्ती भजन कार्यक्रम व ह.भ.प. श्रीनिवास महाराज उत्राणकर यांचे परंपरेचे भजन.

**※ कीर्तन महोत्सव (स्थळ : श्री संत सद्गुरू सखाराम महाराज समाधीसमोर)**

- सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६
सकाळी ७ ते ९ : ह.भ.प. जयदेव बुवा, अमळनेर ९ ते दुपारी १२ : ह.भ.प. बेलापूरकर महाराज
१२ ते २ : ह.भ.प. बबन बुवा, पिंपळेसीम
२ ते ४ : ह.भ.प. अरुण बुवा, पिंपळे बुद्रुक
४ ते सायंकाळी ६ : ह.भ.प. गुलाब बुवा, लोणकर

**※ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६**

सकाळी ७ ते ९ : ह.भ.प. राजू बुवा बैरागी, वाघळी. ९ ते दुपारी १२ : ह.भ.प. बेलापूरकर महाराज १२ ते २ : ह.भ.प. बाजीराव बुवा, आळंदी. २ ते ४ : ह.भ.प. भाईदास बुवा, देवगाव. ४ ते सायंकाळी ६ : ह.भ.प. कोमलसिंग बुवा, हेद्रुण.

**※ बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६**

सकाळी ७ ते ९ : ह.भ.प. पंढरीनाथ बुवा, अमळनेर. ९ ते दुपारी १२ : ह.भ.प. बेलापूरकर महाराज १२ ते २ : ह.भ.प. चत्रभुज बुवा, धरणगाव. २ ते ४ : ह.भ.प. गोकुळ बुवा, पिंपळी. ४ ते सायंकाळी ६ : ह.भ.प. कैलास बुवा, टाकरखेडा.

**※ गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६**

सकाळी ७ ते ९ : ह.भ.प. भगवान बुवा, सडगाव.९ ते दुपारी १२ : ह.भ.प. बेलापूरकर महाराज. १२ ते २ : ह.भ.प. प्रकाश बुवा, अमळनेर. २ ते ४ : ह.भ.प. गोकुळ बुवा, शारंगधर बुवा, चाळीसगाव. ४ ते सायंकाळी ६ : ह.भ.प. रूपचंद बुवा, दहिवद. ▲



*श्री सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी वाडी संस्थानातून बोरी नदीपात्रातील समाधीस्थळाकडे प्रस्थान करताना प. पू. संतश्री प्रसाद महाराज व विविध क्षेत्रातील मान्यवर.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# मसाला पान



# बासरीला स्वतंत्र प्रतिष्ठा देणारे पंडित पन्नालाल घोष

**स्मृतिदिन विशेष**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



भारतीय शास्त्रीय संगीताच्या इतिहासात बासरीला स्वतंत्र, प्रतिष्ठित स्थान मिळवून देण्याचे महान कार्य ज्यांनी केले ते म्हणजे पंडित पन्नालाल घोष. २० एप्रिल रोजी त्यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना त्यांच्या अद्वितीय योगदानाची आठवण करून देणे आवश्यक ठरते.

पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी झाला. बालपणापासूनच त्यांना संगीताची आवड होती. सुरूवातीला त्यांनी विविध वाद्यांचा अभ्यास केला. मात्र बासरीच्या सुरांनी त्यांना विशेष आकर्षित केले. त्या काळात बासरी हे प्रामुख्याने लोकसंगीतातील वाद्य मानले जात होते. परंतु घोष यांनी आपल्या परिश्रम, साधना आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांच्या जोरावर बासरीला हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यांनी बासरीच्या रचनेतही महत्त्वपूर्ण बदल केले. पारंपरिक बासरीपेक्षा मोठ्या आकाराची आणि अधिक सूरछटा निर्माण करू शकणारी बासरी त्यांनी विकसित केली. त्यामुळे रागदारी संगीत सादर करण्यासाठी बासरी अधिक सक्षम बनली. त्यांच्या वादनात गायकांच्या गायकीची छटा स्पष्टपणे जाणवते, जी त्यांच्या शैलीची खास ओळख बनली.

पन्नालाल घोष यांनी अनेक चित्रपटांसाठीही संगीत दिले आणि बासरीवादन लोकप्रिय करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या शिष्यपरंपरेतून अनेक गुणी कलाकार घडले, ज्यांनी पुढे ही परंपरा समृद्ध केली. त्यांच्या वादनात केवळ तांत्रिक प्रावीण्य नव्हते, तर भावनांची सखोल अभिव्यक्तीही होती. त्यामुळे त्यांचे संगीत श्रोत्यांच्या मनाला भिडणारे ठरले. त्यांनी बासरीला केवळ वाद्य न ठेवता, ती एक अभिव्यक्तीची सशक्त भाषा बनवली.

२० एप्रिल १९६० रोजी त्यांचे निधन झाले. आजही त्यांच्या सुरांची मोहिनी तितकीच ताजी आहे. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करताना आपण संगीताच्या या महान साधकाला कृतज्ञतेने स्मरतो. पन्नालाल घोष यांचे आयुष्य आणि कार्य हे पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या सुरांनी भारतीय संगीतविश्वाला दिलेला अमूल्य ठेवा सदैव जीवंत राहील. दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना विनम्र आदरांजली.

# जमी-जमाई नौकरी छोड़ीं, घर भी लगाया दांव पर

## अब १२० करोड़ रुपये का टर्नओवर; जुड़वां भाइयों ने ऐसे किया कमाल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**सक्सेस स्टोरी**

आलोक कौशिक और अनुराग कौशिक चंडीगढ़ से हैं। जुड़वां भाइयों की इस जोड़ी ने बहुत कम समय में एक सफल स्टार्टअप खड़ा कर दिया है। विदेश में जमी-जमाई नौकरी छोड़कर उन्होंने साल २०१९ में भारत में अपने स्टार्टअप की नींव रखी। इसका नाम 'नेचुरल्टेन' है। इसके लिए भाइयों ने अपना घर तक दांव पर लगा दिया। यह क्लीन प्रोटीन सप्लीमेंट बेचता है। जर्मनी में काम करने के दौरान उन्होंने वहां के सख्त क्वालिटी स्टैंडर्ड्स को देखा। तय किया कि वे भारत में भी उसी स्तर का 'क्लीन प्रोटीन' उपलब्ध कराएंगे। आज यह स्टार्टअप १२० करोड़ रुपये के टर्नओवर तक पहुंच गया है। आइए, यहां आलोक कौशिक और अनुराग कौशिक की सफलता के सफर के बारे में जानते हैं।

### विदेश में छोड़ी नौकरी, दांव पर लगाया घर

अनुराग और आलोक कौशिक का सफर चंडीगढ़ से शुरू हुआ। लेकिन, करियर उन्हें पुणे और फिर जर्मनी ले गया। अनुराग एचसीएल (एचसीएल) में प्रोजेक्ट मैनेजमेंट संभाल रहे थे। वहीं, आलोक जर्मनी की दिग्गज कंपनी सॅप में काम करते थे। २०१९ में जब उन्होंने भारतीय बाजार का रुख किया तो पाया कि प्रोटीन सप्लीमेंट्स में स्टैंडर्ड और ट्रांसपेरेंसी की भारी कमी है। अपने इसी विजन के साथ दोनों भाइयों ने अपनी जमी-जमाई नौकरियां छोड़ीं। फिर स्टार्टअप को खड़ा करने के लिए अपना घर तक दांव पर लगा दिया।

### क्वालिटी और टेस्टिंग पर फोकस

जुड़वां भाइयों के स्टार्टअप की सबसे बड़ी ताकत इसकी 'जर्मन क्वालिटी' और कड़े परीक्षण हैं। उनके उत्पाद कोलोन लिस्ट से प्रमाणित हैं। यह एथलीटों के लिए डोपिंग मुक्त होने की गारंटी देता है। इसके अलावा, कंपनी यह सुनिश्चित करती है



कि उनके सप्लीमेंट्स 'ग्लाइफोसेट' (एक हानिकारक कीटनाशक) से मुक्त हों। शुरुआत में उत्पादों का निर्माण जर्मनी में ही होता था। लेकिन, २०२२ के बाद उन्होंने भारत में प्रमाणित थर्ड-पार्टी सुविधाओं के साथ उत्पादन शुरू किया।

### प्रमोशन के लिए अपनाया यह मॉडल

दिलचस्प यह है कि १२० करोड़ रुपये टर्नओवर तक पहुंचने के बावजूद आलोक और अनुराग ने कोई पेड विज्ञापन नहीं चलाए। इसके बजाय उन्होंने अपनी मार्केटिंग स्ट्रैटेजी 'भरोसे' पर आधारित रखी। उन्होंने अपने उत्पाद उन फिटनेस इन्फ्लुएंसर्स को दिए जो वास्तव में हेल्थ के प्रति जागरूक थे। जब इन विशेषज्ञों ने खुद उत्पाद इस्तेमाल किए और उन्हें पसंद किया तो 'वर्ड ऑफ माउथ' (मुंह जुबानी प्रचार) के जरिए ब्रांड की वैल्यू बढ़ती गई। आज कंपनी के ७० प्रतिशत से अधिक ऑर्डर सीधे उनकी वेबसाइट से आते हैं।

### बड़ा है भविष्य का टारगेट

आलोक और अनुराग के स्टार्टअप की ग्रोथ जबरदस्त रही है। वित्त वर्ष २०२२-२३ में १२ करोड़ रुपये के रेवेन्यू से शुरू होकर कंपनी ने वित्त वर्ष २०२५-२६ में १२० करोड़ रुपये का आंकड़ा छू लिया है। इसमें ८ करोड़ रुपये का शुद्ध मुनाफा शामिल है। अब तक ७ लाख से अधिक ग्राहकों को सेवा दे चुके ये भाई वित्त वर्ष २०२६-२७ में २३० करोड़ रुपये के रेवेन्यू का टारगेट लेकर चल रहे हैं। उनका मानना है कि उन्होंने कभी उत्पाद 'बेचना' नहीं सीखा। इसके बजाय सिर्फ 'सही उत्पाद बनाना' सीखा। यही उनकी सफलता का असली राज है।

# जगातील एकमेव 'देश' ज्याला जमीनच नाही!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपण कधी अशा लोकांबद्दल ऐकले आहे का, ज्यांचा जमिनीशी कोणताही संबंध नाही? ज्यांच्याकडे ना पासपोर्ट आहे, ना जमिनीवर पक्के घर. आपण बोलत आहोत 'बजऊ' लोकांविषयी. ज्यांना जगातील शेवटचे खरे 'समुद्री खानाबदोश' किंवा समुद्रातील भटके लोक म्हटले जाते. यांचा जन्म बोटीवर होतो, हे समुद्राच्या लाटांवरच मोठे होतात आणि त्यांचे संपूर्ण आयुष्य निळ्या पाण्याभोवतीच संपते.



सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ जोरदार व्हायरल होत आहे. ज्यामध्ये काही लोक कोणत्याही ऑक्सिजन सिलिंडर किंवा डायव्हिंग सूटशिवाय समुद्राच्या खोलीत अगदी सहज वावरत आहेत. हे लोक 'बजऊ' जमातीचे असून, ते इंडोनेशिया आणि मलेशियाच्या दरम्यान असलेल्या समुद्रात राहतात. त्यांची घरे लाकडाच्या खांबांवर पाण्यावरच बांधलेली असतात. बजऊ लोकांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते कोणत्याही एका देशाशी किंवा सरहद्दीशी बांधलेले नाहीत. ते पिढ्यान्पिढ्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत असतात, त्यामुळे त्यांना कोणत्याही एका देशाचे नागरिक म्हणणे कठीण आहे. त्यांच्यासाठी समुद्रच त्यांचे घर आणि उपजीविकेचे साधन आहे.

शास्त्रज्ञांच्या मते शेकडो वर्षे पाण्यात राहिल्यामुळे या लोकांच्या शरीरात काही जनुकीय बदल झाले आहेत. पाण्याखाली स्पष्ट दृष्टी : सामान्य मानवाला पाण्याखाली सर्व काही धूसर दिसते; मात्र बजऊ लोकांच्या डोळ्यांना पाण्याखाली अगदी स्पष्ट दिसते.

खोलवर जाण्याची क्षमता : या जमातीची मुले अगदी लहानपणापासूनच गोताखोरी सुरू करतात. जगण्यासाठी ते १०० फूट खोल समुद्रात सहज डुबकी मारू शकतात. समुद्रात खोलवर जात असताना पाण्याचा दाब सहन करण्यासाठी बजऊ लोक लहानपणीच स्वतःचे कानाचे पडदे फोडून घेतात. हे ऐकायला अत्यंत वेदनादायक वाटते; परंतु खोल पाण्यात शिकार करताना दबाव जाणवू नये म्हणून ते ही पद्धत अवलंबतात. यामुळे म्हातारपणापर्यंत हे लोक मोठ्या प्रमाणावर बहिरे होतात; मात्र समुद्रात जगण्यासाठी ते याच तंत्रावर अवलंबून आहेत.

# उन्हाळ्यात फोन किती टक्के चार्ज करावा?

## ९० टक्के लोकांना हे माहितीच नाही

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



काय तुमचा फोनही चार्जिंगला लावल्यावर प्रचंड गरम होतोय? उन्हाळ्यात फोन चार्ज करण्याची पद्धत चुकीची असेल, तर मोठी दुर्घटना घडू शकते. फोनची बॅटरी लाईफ टिकवण्यासाठी आणि स्फोटाचा धोका टाळण्यासाठी चार्जिंगचे 'हे' नियम नक्की फॉलो करा. कारण, उन्हाळ्यात फोनच्या बॅटरीचा स्फोट होण्याच्या बातम्या आपण वारंवार वाचतो. याचे मुख्य कारण समजून घ्या.

स्मार्टफोन आता आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाला आहे. मात्र, उन्हाळ्यात वाढते तापमान फोनच्या बॅटरीसाठी सर्वात मोठा शत्रू ठरते. उन्हाळ्यात फोनच्या बॅटरीचा स्फोट होण्याच्या बातम्या आपण वारंवार वाचतो. याचे मुख्य कारण म्हणजे उष्णता आणि चुकीच्या पद्धतीने केलेले चार्जिंग.

### उन्हाळ्यात फोन किती टक्के चार्ज करावा?

तंत्रज्ञांच्या मते उन्हाळ्यात फोन कधीही १०० टक्के चार्ज करू नये. उन्हाळ्यात बॅटरीचे तापमान आधीच जास्त असते. पूर्ण चार्जिंग केल्यामुळे बॅटरीवर रासायनिक ताण येतो. सर्वांत सुरक्षित मार्ग म्हणजे तुमचा फोन २० टक्के ते ८० टक्क्यांदरम्यान चार्ज ठेवावा. जेव्हा चार्जिंग ८० टक्के होईल तेव्हा प्लग काढून टाकावा. यामुळे बॅटरी जास्त गरम होत नाही.

### २० ते ८० टक्केचा नियम

बॅटरीचे आयुष्य वाढते : २० ते ८० टक्केचा नियम पाळल्यास बॅटरीचे सायकल टिकून राहते आणि बॅटरी फुगत नाही. फोन गरम न झाल्यामुळे इंटरनल कॉम्पोनंट्स सुरक्षित राहतात. बॅटरी थंड राहिली की फोन हँग होत नाही आणि वेगवान चालतो.

### चुकीच्या पद्धतीने चार्जिंग करण्याचे तोटे

उन्हाळ्यात १०० टक्के चार्जिंग आणि सोबतच गेमिंग किंवा जड वापर केल्यास बॅटरीचा स्फोट होऊ शकतो. उष्णतेमुळे बॅटरी वेगाने संपू लागते. अति उष्णतेमुळे फोनचा डिस्प्ले किंवा मदरबोर्ड कायमचा निकामी होऊ शकतो.

### उन्हाळ्यात 'या' ५ गोष्टी टाळाच!

**कव्हर काढून चार्ज करा :** उन्हाळ्यात फोन चार्ज करताना मागील जाड कव्हर काढून ठेवा, जेणेकरून उष्णता बाहेर पडू शकेल.

**उशीखाली फोन ठेवू नका :** रात्री झोपताना उशीखाली किंवा गादीवर फोन ठेवून चार्ज करू नका, यामुळे फोनला हवा मिळत नाही.

**कारच्या डॅशबोर्डवर फोन टाळा :** उन्हात उभ्या असलेल्या कारमध्ये फोन ठेवणे म्हणजे स्फोटाला निमंत्रण देणे आहे.

फास्ट चार्जिंगवर लक्ष ठेवा: जर तुमचा फोन खूप गरम होत असेल, तर काही काळ फास्ट चार्जरऐवजी साध्या चार्जरचा वापर करा.

**वापरताना चार्जिंग नको :** चार्जिंग सुरू असताना फोनवर गेम खेळणे किंवा व्हिडिओ कॉल करणे टाळा. स्मार्टफोन महागडा असो वा स्वस्त, उन्हाळ्यातील उष्णता सर्वांसाठी सारखीच आहे. बॅटरी ८० टक्क्यांपर्यंतच चार्ज करणे आणि फोनला थंड वातावरणात ठेवणे, हाच सध्या सुरक्षित राहण्याचा सर्वोत्तम उपाय आहे.

# पावसाचे संकेत कोणते प्राणी देतात?

## निसर्गाचे अचूक 'हवामान खाते' आणि त्यामागील विज्ञान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हवामान खात्याचा अंदाज कधी चुकेलही, पण निसर्गातील मुक्या प्राण्यांचे संकेत सहसा चुकत नाहीत. पाऊस येण्यापूर्वी निसर्गात अनेक बदल होतात. ते मानवी डोळ्यांना सहजासहजी दिसत नाहीत. मात्र, पक्ष्यांचे थवे, मुंग्यांची लगबग आणि बेडकांचे डराव-डराव करणे यामागे हे शास्त्र लपलेले आहे. प्राचीन काळापासून ग्रामीण भागात प्राण्यांच्या वर्तनावरून पावसाचा अंदाज लावला जातो, ज्याला आता आधुनिक विज्ञानानेही दुजोरा दिला आहे.



घराभोवती अचानक मुंग्यांची रांग दिसू लागली किंवा मोर आनंदाने थुई-थुई नाचू लागले, तर समजा पावसाचे आगमन जवळ आले आहे. प्राणी आणि पक्ष्यांमध्ये निसर्गातील सूक्ष्म बदल टिपण्याची अद्भुत क्षमता असते. हवेतील आर्द्रता आणि दाबातील बदल ओळखून हे प्राणी आपल्याला पावसाचे आधीच संकेत देतात. या रंजक विज्ञानाचा प्रवास आणि प्राण्यांचे हे 'वेदर फोरकास्टिंग' नक्की कसे चालते, हे आज आपण सविस्तर जाणून घेणार आहोत.

निसर्ग हा स्वतःमध्येच एक मोठी प्रयोगशाळा आहे. मानवाकडे हवामानाचा अंदाज लावण्यासाठी सॅटेलाईट आणि रडार आहेत, पण प्राण्यांकडे त्यांच्या नैसर्गिक संवेदना आहेत. जेव्हा पाऊस येणार असतो, तेव्हा हवेतील दाब कमी होतो आणि आर्द्रता वाढते. हे बदल प्राणी कसे ओळखतात.

### मुंग्यांची सुरक्षित स्थळी धाव

पाऊस येण्यापूर्वी तुम्ही अनेकदा पाहिले असेल की, मुंग्या आपली अंडी घेऊन उंचावर किंवा सुरक्षित ठिकाणी जात असतात. विज्ञानानुसार, मुंग्या हवेतील आर्द्रतेतील अत्यंत सूक्ष्म बदल ओळखू शकतात. पावसाचे पाणी बिळात शिरून अंडी नष्ट होऊ नयेत, म्हणून त्या आधीच सुरक्षित जागा शोधतात.

### बेडकांचे ओरडणे

पावसाळा जवळ आला की बेडकांचा आवाज वाढतो. हे केवळ ओरडणे नसून ते त्यांच्या जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी असते. पावसाच्या आगमनामुळे जलाशयांमध्ये पाणी वाढणार असते, जे त्यांच्या अंडी घालण्यासाठी पूरक असते. नॅशनल जिओग्राफिकच्या मते, हवेतील ओलावा वाढताच बेडकांची त्वचा अधिक संवेदनशील होते, ज्यामुळे ते अधिक सक्रिय होतात.

### पक्ष्यांचे उडणे

पक्षी आकाशात खूप उंचावर उडण्याऐवजी जमिनीच्या जवळ उडू लागले, तर तो पाऊस येण्याचा संकेत मानला जातो. कमी दाबाच्या हवेमुळे पक्ष्यांना उंचावर उडणे कठीण जाते. तसेच, पावसापूर्वी कीटक जमिनीच्या जवळ उडू लागतात आणि त्यांना खाण्यासाठी पक्षीही खाली येतात.

### मोराचा नाच

'नभोमंडळी ढग वाजता, मोर नाचतो वनी' हे केवळ गाणे नाही. पावसापूर्वी जेव्हा ढगांचा गडगडाट होतो आणि हवेत गारवा येतो, तेव्हा मोर आपला पिसारा फुलवून नाचू लागतो. हे त्यांच्या प्रजनन काळाचे आणि आनंदाचे लक्षण असते.

### गायींचे वर्तन

असे मानले जाते की पाऊस येण्यापूर्वी गायी अस्वस्थ होतात किंवा चरताना अचानक जमिनीवर बसतात. विज्ञानानुसार, हवेतील दाब कमी झाल्यामुळे गायींना उभे राहणे थोडे अस्वस्थ वाटते आणि त्या आपली ऊर्जा वाचवण्यासाठी खाली बसतात.

### मासे आणि कासव

पाऊस येण्यापूर्वी मासे पाण्याच्या पृष्ठभागावर येऊन उड्या मारू लागतात. याचे कारण म्हणजे हवेतील दाब कमी झाल्याने पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन कमी होतो आणि श्वास घेण्यासाठी मासे वर येतात. प्राण्यांचे हे वर्तन केवळ योगायोग नसून ती त्यांच्या अस्तित्वासाठी केलेली धडपड असते. विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की प्राण्यांच्या शरीरातील 'सेन्सर्स' मानवापेक्षा कितीतरी पटीने प्रगत आहेत.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे. सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# अक्षय्य तृतीयेचा इतिहास, महत्त्व आणि पौराणिक कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अक्षय्य तृतीया हिंदू दिनदर्शिकेतील एक दिवस आहे. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वैशाख शुद्ध तृतीया या दिवशी अक्षय्य तृतीया येते. अक्षय्य तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त समजला जातो. 'कालविवेक' या ग्रंथामध्ये या दिवशी व्रत करण्याचे महत्त्व सांगितलेले आहे. जैन धर्मामध्येही या दिवशी व्रत करण्याचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी अन्नपूर्णा (देवीची) जयंती, परशुराम जयंती आणि बसवेश्वर महाराज जयंतीही असते. या दिवशी भगवान व्यास यांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला प्रारंभ केला आणि त्यांचे लेखनिक म्हणून गणपतीने काम केले अशी आख्यायिका प्रचलित आहे. या दिवशी मिळालेले पुण्य कधीही संपत नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे माणसांचे भाग्य वाढते.

## धार्मिक आचार

हा दिवस पूर्वजांचे ऋण फेडण्याचा दिवस म्हणून पाळला जातो. पूर्वजांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी या दिवशी पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतात.या दिवशी मातीचे मडके आणून, त्यात पाणी भरून त्यात वाळा टाकतात. त्याने या पाण्याला सुगंध येतो.पळसाच्या पानांच्या केलेल्या पत्रावळीवर व द्रोणात तांदळाची खीर, कैरीचे पन्हे किंवा चिंचोणी, पापड, कुरडया इत्यादी वाढतात. सुगंधित पाण्याने भरलेला घट ब्राह्मणाला दान करतात. असे केल्याने पितरांचा संतोष होतो असे मानले जाते. या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभ कार्याचे फळ 'अक्षय्य'(न संपणारे) असे मिळते, असा समज आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सुख व समृद्धी प्राप्त करून देणाऱ्या देवतेच्या कृतज्ञतेचा भाव ठेवून केलेल्या उपासनेमुळे आपल्यावर होणाऱ्या त्या देवतेच्या कृपादृष्टीचा कधीही क्षय होत नाही, अशी समजूत आहे.

## महत्त्व

या दिवशी भारताच्या उत्तराखंड राज्यातील बद्रीनारायणाच्या बंद देवळाचे दार उघडतात. हे मंदिर अक्षय्य तृतीयेला उघडल्यावर दिवाळीतल्या भाऊबीजेच्या दिवशी बंद होते. नर–नारायण या दोन देवतांनी या दिवशी अवतार घेतला होता असे मानले जाते. परशुरामाचे अवतरणसुद्धा याच दिवशी झाले होते असे मानले जाते. या दिवशी परशुरामाची पूजा केली जाते. वृंदावनाच्या श्री बांकेबिहारीच्या मंदिरात फक्त याच दिवशी श्रीविग्रहाचे चरणदर्शन होते आणि बाकी पूर्ण वर्ष ते वस्त्रांनी झाकलेले असतात. जो मनुष्य या दिवशी गंगा स्नान करेल, तो पापांतून मुक्त होतो अशी भारतीय संस्कृतीत धारणा आहे. कृष्णाने युधिष्ठिराला असे सांगितले होते की, 'या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही, म्हणून हिला अक्षय्य तृतीया असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय अविनाशी होते.



## सांस्कृतिक महत्त्व

महाराष्ट्रातील स्त्रिया चैत्र महिन्यात चैत्रगौरीची स्थापना व पूजा करतात. चैत्रातील एखाद्या दिवशी हळदीकुंकवाच्या निमित्ताने बायकांना घरी बोलावून मोगऱ्याची फुले किंवा गजरा, आंब्याची डाळ, किंवा भिजवलेले हरबरे आणि पन्हे देतात. त्या हळदीकुंकू समारंभांचा (गौरी उत्सवाचा) अक्षय्य तृतीया हा शेवटचा दिवस असतो.

## आख्यायिका

अक्षय्य तृतीयेला कृत युग संपून त्रेतायुग सुरू झाले असे मानले जाते. ज्योतिषशास्त्रात कृत, त्रेता, द्वापर आणि कलियुगाची सर्व वर्ष मिळून होणाऱ्या काळाला 'महायुग' असे म्हणतात. ही चार युगे महायुगाचे चार चरण असल्याचे मानले जाते. ब्रह्मदेवाच्या दिवसाचा जो प्रारंभ त्याला 'कल्पादीं' तसेच त्रेतायुगाचा (12,96,000 सौर वर्षाएवढा त्रेतायुगाचा काळ) प्रारंभ म्हणजे 'युगादी' ही तिथी वैशाख शुद्ध तृतीयेला येते. मात्र त्रेतायुग नेमक्या कोणत्या वर्षी सुरू झाले त्याची माहिती मिळत नाही.हा दिवस पृथ्वीचे रक्षक श्री भगवान विष्णू यांना समर्पित आहे हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार याच दिवशी भगवान विष्णूंनी परशुरामाच्या रूपात पृथ्वीवर अवतार घेतला होता.दुसऱ्या मान्यतेनुसार प्रेतायुगाच्या प्रारंभी हिंदू धर्मातील सर्वात पवित्र मानली जाणारी गंगा नदी या दिवशी भगीरथाने पृथ्वीवर आणली होती. या पवित्र नदीचे पृथ्वीवर आगमन झाल्याने या दिवसाचे पावित्र्य वाढते अक्षय तृतीयेच्या दिवशी माता अन्नपूर्णेची ही पूजा केली जाते. अन्नपूर्णेच्या पूजेने स्वयंपाक घर पवित्र होते आणि अन्नाची ही चव वाढते. महर्षी वेद व्यास यांनी अक्षय तृतीयेच्या दिवशी महाभारत लिहिण्यास सुरुवात केली. महाभारतातील युधिष्ठिरला अक्षय पात्र प्राप्त झाले होते या अक्षय पात्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातून अन्न कधीच संपत नव्हते या पात्राद्वारे युधिष्ठिर आपल्या राज्यातील गरीब व भूकेल्या लोकांना अन्नदान करीत असे याच श्रद्धेच्या आधारावर या दिवशी केलेले दानाचे पुण्य अक्षय मानले जाते. अक्षय तृतीये मागे हिंदूंची आणखी एक श्रद्धा आहे श्रीकृष्ण अवतारा त्याचा गरीब मित्र सुदामा त्याला भेटायला आला कृष्णाला देण्यासाठी सुदामाकडे मूठभर पोहे होते ते सुद्धा माने श्रीकृष्णाच्या चरणी अर्पण केले आपला मित्र व सर्वांचे हृदय जाणणाऱ्या श्रीकृष्णाने सर्व काही समजून घेऊन सुदाम्याचे दारिद्र्य दूर केले त्याच्या झोपडीचे महालात रूपांतर केले आणि त्याला सर्व सुविधांनी परिपूर्ण केले तेव्हापासून अक्षय तृतीयेला केलेल्या दानाचे महत्त्व वाढले या दिवशी आपण ज्या वस्तूंचे दान करतो.

## सांस्कृतिक आचार

या दिवशी जवळच्या नदीत किंवा जमल्यास गंगेत वा समुद्रात अंघोळ करणे. सकाळी पंखा, तांदूळ, मीठ, तूप, साखर, चिंच, फळ आणि वस्त्राचे दान देऊन ब्राह्मणांना दक्षिणादान.ब्राह्मण भोजन घालणे. या दिवशी सातूचे महत्त्व असून ते नक्की खाणे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी नवीन घरात प्रवेश, वस्त्र, शस्त्र, दागिने, नवीन वस्तू घेणे, मोठे आर्थिक व्यवहार करणे आदी शुभ कामेही केली जातात. या दिवशी नवीन वास्तुत गृहप्रवेश करणे नवीन वस्तू खरेदी करणे व सोने खरेदी करणे अशा महत्त्वपूर्ण गोष्टी केल्या जातात या दिवशी केलेल्या शुभकार्याचे श्रेष्ठ फळ मिळते अशा प्रकारे अक्षय तृतीया हिंदू धर्मात अत्यंत उत्साहाने साजरी केली जाते.

## भारतातील विविध प्रदेशांतील परंपरा आणि चालीरीती

१) **महाराष्ट्र :** महाराष्ट्रातील खान्देश मध्ये अक्षय तृतीयेच्या सणाला "आखाजी" म्हणून संबोधले जाते, खान्देशात आखाजी हा सण दीपावली इतकाच महत्त्वाचा गणला जातो. सालदार, बलुतेदार अक्षय तृतीया या दिवसापासून नवी सुरुवात करतात.

२) **उत्तर भारत :** या प्रांतात या दिवशी पूजा आणि प्रार्थना केल्या जातात. परशुराम जन्मोत्सव साजरा केला जातो.गंगा नदीमध्ये स्नान करणे, तीर्थयात्रा करणे, यज्ञ करणे तसेच अन्न आणि धनाचे दान करणे, ब्राह्मणाला सातू आणि समिधा देणे,असे धार्मिक आचार या दिवशी केले जातात.

३) **ओरिसा :** या प्रांतात शेतकरी वर्गात या दिवसाचे महत्त्व विशेष आहे. या दिवशी लक्ष्मी देवतेची पूजा करून नवीन धान्याची पेरणी केली जाते. या सणाला मुठी चूहाणा म्हटले जाते. या दिवशी पालेभाज्या आणि मांसाहार यांचे सेवन केले जात नाही.प्रसिद्ध अशा जगन्नाथ रथयात्रेचा प्रारंभ या दिवशी होतो.देवाच्या नौका विहारासाठी पाच बोटी यानिमित्ताने सुशोभित केल्या जातात.

४) **दक्षिण भारत :** महाविष्णू आणि लक्ष्मी व कुबेर पूजन यांचे महत्त्व या दिवशी असते.मंदिरात दर्शनाला जाणे,अन्नदान करणे असे आचार या दिवशी केले जातात.

५) **पश्चिम बंगाल :** या प्रदेशातील व्यापारी वर्गात अक्षय्यतृतीया महत्त्वाचा दिवस मानला जातो. हालकटा या नावाने या दिवशी गणपतीची आणि लक्ष्मीची विशेष पूजा केली जाते. व्यापारी लोक नव्या हिशोबाच्या वह्या या दिवशी वापरात आणतात.

६) **राजस्थान :** राजस्थानातही हा दिवस शुभ मुहूर्ताचा समजतात.. तेथे या दिवसाला आखा तीज असे म्हणतात. राजस्थानातील शहरी आणि ग्रामीण भागांत या दिवशी विवाह करण्याची पद्धती आहे.

### अन्य धर्मात

१) **बौद्ध धर्म :**
बौद्ध धर्मामध्ये आखाजी या दिवसाचे विशेष महत्व मानले जाते. बौद्ध धर्मातील क्षत्रिय परंपरेत या दिवसाचे औचित्य आहे.

२) **जैन धर्म :**
भगवान वृषभदेव यांनी मोक्ष प्राप्त करण्यासाठी सहा महिने तप करावे लागले. त्याकाळात त्यांनी अन्नपाणी ग्रहण केले नव्हते, व त्यानंतर ते एकदा ग्रहणासाठी निघाले परंतु लोकांना आहार दानाची योग्य विधी माहीत नसल्या कारणाने त्यांना अजुन पुढील सहा महिने आहार घेता आला नाही अर्थात त्यांचा वर्ष भर उपवास झाला. एकदा हस्तिनापूर येथे ते आले असता तेथील राजाने त्यांना उसाचा रसाचा आहार दिला. तो दिवस अक्षय्य तृतीयेचा होता.

# निदान याप्रसंगी तरी याला मडके म्हणू नका!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अक्षय्य तृतीयेची पूजा करायची म्हणून खरेदीला गेलो होतो. तेथे माझे मित्रही खरेदीसाठी आले होते. ते कुंभार मित्राला म्हणाले 'मडकं दे'. तो कुंभार, पटकन म्हणाला, की आज तरी तरी 'मडके' म्हणू नका. खरेतर मलाही माहिती नव्हते, की त्याला नक्की काय म्हणतात. उत्सुकतेपोटी मी त्याला विचारले, 'मग काय म्हणतात याला' तो म्हणाला, 'स्वर्गीय माता' म्हणून लालरंगाचे त्याला केळी 'स्वर्गीय पिता' म्हणून काळ्यारंगाचे त्याला करा म्हणतात. माझ्या मराठी शब्दकोषात २ शब्द वाढले. मराठीत मातीच्या या भांड्याला उपयुक्ततेनुसार व प्रसंगानुसार वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते, अशी माहिती त्या कुंभाराकडून झाली.

पाण्याचा ... माठ
अंत्यसंस्काराला... मडके
नवरात्रात ... घट
वाजविण्यासाठी... घटम्
संक्रांतीला... सुगडे
दहीहंडीला... हंडी
दही लावायला... गाडगे
लक्ष्मीपूजनाचे... बोळके
लग्नविधीत... अविघ्न कलश
आणि
अक्षय्य तृतीयेला... केळी व करा

खरोखरच आपली मराठी भाषा किती समृद्ध व श्रीमंत आहे. मंगलप्रसंगी हातात धरतात त्याला 'करा' म्हणतात, हे आपणास माहिती होते. पण अक्षय्य तृतीयेला 'केळी व करा' म्हणतात माहिती नव्हते. आपणास हे माहीत होते का?

# अक्षय्य तृतीयेवर लक्ष्मी प्राप्तीसाठी कोणते ६ सोपे उपाय?

धन संपत्तीचा संबंध वास्तूशास्त्राशी असतो. त्या अनुषंगाने कोणत्याही मनुष्यावर सकारात्मक आणि नकारात्मक शक्तींचा प्रभाव असतो. अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर खालील उपाय केल्याने देवी लक्ष्मी आपल्यावर कशी प्रसन्न होते.

१) **लग्न राशीच्या 'स्वामी ग्रह' करा प्रसन्न :** प्रत्येक जातकाची एक चंद्र राशी असते. जातकाचे गुण आणि व्यवहारावर लग्न राशी प्रभाव टाकते. जर आपल्या कामांमध्ये अडथळे येत असतील किंवा आर्थिक रूपाने परेशान असाल तर आपल्या लग्न राशीच्या 'स्वामी ग्रह' च्या अनुकूल रंगाची एखादी वस्तू नेहमी स्वतःजवळ असू द्या. किंवा त्या रंगाचा रुमालही जवळ ठेवा.

२) **अलमारी योग्य ठिकाणी ठेवा :** पैसे ठेवण्याची अलमारी, उत्तर दिशेच्या खोलीत दक्षिण भिंतीवर लागलेली असल्यास धन वृद्धी लाभ देते.

३) **मुख्य दारावर दिवा लावा :** दररोज सकाळी लक्ष्मी पूजन करायला हवे आणि सायंकाळी मुख्य दाराच्या उजवीकडे तुपाचा दिवा लावायला हवा. हे दोन्ही कार्य केल्यास लक्ष्मी प्रसन्न होते.

४) **घराच्या मुख्य दारावर गणपती :** गणपती बाप्पांचा फोटो किंवा मूर्ती घरातील मुख्य दारावर लावल्याने घरात धन संबंधी समस्या सुटतात. अशाने घरात नकारात्मक शक्ती प्रवेश करत नाही.

५) **घरात तुळस लावा :** तुळस लावून नियमित झाडाला पाणी दिल्याने कधीच धन–धान्याची कमी भासत नाही.

६) **गायीला चारा खाऊ घाला :** रोज सकाळी स्नान केल्यानंतर गायीला हिरवा चारा किंवा कणीक किंवा पोळी खाऊ घालावी. याने लक्ष्मी प्रसन्न होते.

# अक्षय्य तृतीया म्हणजे काय? का साजरी केली जाते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वैशाख शुद्ध तृतीया या दिवशी अक्षय्य तृतीया येते. अक्षय्य तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त समजला जातो. हिंदू धर्मग्रंथ आणि धार्मिक ग्रंथांमध्ये वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी कारणे देण्यात आली आहेत.

## अक्षय्य तृतीयेचा सण का साजरा केला जातो?

भगवान परशुराम हे विष्णूंचे सहावे अवतार आहेत. परशुरामांचा जन्म महर्षी जमदग्नी आणि आई रेणुकादेवी यांच्यापोटी झाला. याच कारणामुळे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी भगवान विष्णूंचीही पूजा केली जाते. यासोबतच परशुरामजींचीही पूजा केली जाते. असे मानले जाते, की या दिवशी माता गंगा स्वर्गातून निघून पृथ्वीवर आली होती. राजा भगीरथने गंगा पृथ्वीवर आणण्यासाठी हजारो वर्षे तपश्चर्या केली.

विशेषतः या दिवशी पवित्र गंगेत स्नान केल्याने मानवाच्या सर्व दुष्कृत्यांचा नाश होतो. असे मानले जाते, की या दिवशी माता गंगा स्वर्गातून निघून पृथ्वीवर आली होती. राजा भगीरथने गंगा पृथ्वीवर आणण्यासाठी हजारो वर्षे तपश्चर्या केली. विशेषतः या दिवशी पवित्र गंगेत स्नान केल्याने मानवाच्या सर्व दुष्कृत्यांचा नाश होतो. या दिवशी आई अन्नपूर्णाचा वाढदिवसही साजरा केला जातो. गरिबांना जेवण दिले जाते. अन्नपूर्णा माँ अन्नपूर्णा आशीर्वाद देते आणि स्त्रिया त्यांचे स्वयंपाकघर पूर्ण करण्यासाठी तिची पूजा करतात. महर्षी वेद व्यास यांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी महाभारत लिहायला सुरुवात केली. हा पाचवा वेद मानला जातो. शक्तिशाली श्रीमद भागवत गीतेचाही यात समावेश आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी श्रीमद्भगवद्गीतेच्या १८ व्या अध्यायाचे पठण करावे.

बंगालमध्ये व्यापारी सर्वशक्तिमान भगवान गणेश आणि माता लक्ष्मी यांची पूजा करून त्यांचे खाते सुरू करतात. त्यामुळे या दिवसाला 'हलख्ता' असेही म्हणतात. भगवान शंकरजींनी या दिवशी भगवान कुबेर आणि माता लक्ष्मी यांचा आदर्श ठेवण्याची सूचना केली होती, त्यानंतर अक्षय्य तृतीयेला माता लक्ष्मींची पूजा केली जाते आणि ही प्रथा आजही सुरू आहे.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी पांडवपुत्र युधिष्ठिर यालाही अक्षयपत्र मिळाले होते. त्याची खास गोष्ट म्हणजे त्यात नेहमी भरपूर अन्न असते. पौराणिक कथेनुसार या दिवशी नर–नारायण, परशुराम आणि हयग्रीव अवतरले होते. तर काही लोकांच्या मते नर–नारायण, परशुराम आणि हयग्रीव यांच्यासाठी ते जव किंवा गहू, काकडी आणि भिजवलेली हरभरा मसूर यांचे सत्तू अर्पण करतात.

# अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त शुभ कसा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वर्षभरात साडेतीन शुभ मुहूर्त असतात. ते खालीलप्रमाणे आहेत.

दसरा, गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया हे तीन पूर्ण मुहूर्त आहेत. तर दिवाळीचा पाडवा कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा अर्धा मुहूर्त आहे. कोणत्याही शुभ कार्याचा, नवीन कार्याचा प्रारंभ या दिवशी करतात. हे मुहूर्त पूर्ण शुद्ध असल्यामुळे या दिवशी इतर दिवसांप्रमाणे कोणतेही शुभ काम सुरू करण्यास दिनशुद्धी बघण्याची गरज नाही. या दिवशी हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वैशाख शुद्ध तृतीया येते. अक्षय्य तृतीया हा महत्त्वाच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त समजला जातो. या दिवशी नर–नारायण या जोडदेवाची जयंती, परशुराम जयंती, बसवेश्वर जयंती आणि हयग्रीव जयंती असते.

**अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्तं**
**तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया ।**
**उद्दिश्य दैवतपितृन्क्रियते मनुष्यैः**
**तच्चाक्षयं भवति भारत सर्वमेव ।। मदनरत्न**

**अर्थ :** (श्रीकृष्ण म्हणतात) हे युधिष्ठिरा, या तिथीस केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही; म्हणून हिला मुनींनी 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय्य (अविनाशी) होते.

## सांस्कृतिक समारंभ

महाराष्ट्रातील स्त्रिया चैत्रातील एखाद्या दिवशी हळदी–कुंकवाच्या निमित्ताने बायकांना घरी बोलावून मोगऱ्याची फुले किंवा गजरा, आंब्याची डाळ (किंवा भिजवलेले हरबरे) आणि पन्हे देतात. त्या हळदी–कुंकू समारंभांचा (गौरी उत्सवाचा) अक्षय तृतीया हा शेवटचा दिवस असतो.

## ज्योतिषविषयक समजुती

१) अक्षय्य तृतीयेला कृत युग संपून त्रेतायुग सुरू झाले, असे सांगितले जाते. या दिवशी दुसऱ्या युगाला सुरूवात झाली होती. ज्योतिषशास्त्रात कृत, त्रेता, द्वापर आणि कलियुगाची सर्व वर्ष मिळून होणाऱ्या काळाला 'महायुग' असे म्हणतात. ही चार युगे महायुगाचे चार चरण असल्याचे मानले जाते. ब्रह्मदेवाच्या दिवसाचा जो प्रारंभ त्याला 'कल्पादीं' तसेच त्रेतायुगाचा (१२,९६,००० सौर वर्षाएवढा त्रेतायुगाचाकाळ) प्रारंभ म्हणजे 'युगादी' ही तिथी वैशाख शुद्ध तृतीयेला येते.

## शेतीसंबंधी प्रथा

**१) मातीत आळी घालणे व पेरणी :** पावसाळा तोंडावर घेऊन अक्षय्य तृतीया येते. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीचे मशागत करण्याचे काम अक्षय्य तृतीयेच्या दिवशी पूर्ण करायची प्रथा आहे. (मशागत म्हणजे नांगरलेल्या शेतजमिनीची साफसफाई करून खत मिश्रित मातीच्या थरांना खालीवर करणे.) या दिवशी मशागत केलेल्या जमिनीतील मृत्तिकेबद्दल कृतज्ञ भाव ठेवून काही शेतकरी पूजन केलेल्या मृतिकेमध्ये आळी घालतात. कोकणात या दिवशी शेतात बियाणे पेरण्याची प्रथा आहे, देशावर नाही. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बियाणे पेरण्यास सुरुवात केल्यास त्या बियाणांपासून विपुल धान्य पिकते व कधीही बियाणाला तोटा पडत नाही, अशी धार्मिक समजूत आहे. (बियाणे म्हणजे मळणीतील धान्य आपल्या आवश्यकतेनुसार खाण्यासाठी बाजूला काढून घेऊन पुढच्या पेरणीसाठी राखून ठेवलेले उरलेले धान्य.)

**२) वृक्षारोपण :** अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आळी करून लावलेल्या फळबागा भरघोस फळ उत्पादन देतात अशी समजूत आहे. आयुर्वेदात सांगितलेल्या औषधी वनस्पतीही अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर रोवल्यास या वनस्पतींचा क्षय होत नाही, म्हणजेच औषधी वनस्पतींचा तुटवडा भासत नाही, अशी समजूत आहे.



## धार्मिक समजुती

हा दिवस पूर्वजांचे ऋण फेडण्याचा दिवस म्हणून पाळला जातो. पूर्वजांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी या दिवशी पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतात. या दिवशी मातीचे घागरीयेवढे मडके आणून, त्यात पाणी भरून त्यात वाळा टाकतात. त्याने या पाण्याला सुगंध येतो.पळसाच्या पानांच्या केलेल्या पत्रावळीवर व द्रोणात खीर आंब्याचे पन्हे किंवा चिंचोणी, पापड, कुरडया इत्यादी वाढतात. सुगंधित पाण्याने भरलेला घट ब्राह्मणाला दान केला जातो. असे केल्याने पितरांचा आत्मा शांत होतो असे मानले जाई.

या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभ कार्याचे फळ 'अक्षय्य' (न संपणारे) असे मिळते, असा समज आहे. अक्षय्य तृतीयेला ब्रह्मा व श्रीविष्णू यांच्या मिश्र लहरी उच्च देवतांच्या लोकांतून, म्हणजे सगुणलोकांतून पृथ्वीवर येतात. त्यामुळे पृथ्वीवरील सात्त्विकता १० टक्क्यांनी वाढते.

**१) अर्थ :** अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सदोदित सुख व समृद्धी प्राप्त करून देणाऱ्या देवतेच्या कृतज्ञतेचा भाव ठेवून केलेल्या उपासनेमुळे आपल्यावर होणाऱ्या त्या देवतेच्या कृपादृष्टीचा कधीही क्षय होत नाही, अशी समजूत आहे अक्षय तृतीया हा सण साजरा करण्याची पद्धत 'कालविभागाचा कोणताही प्रारंभदिवस भारतियांना नेहमीच पवित्र वाटतो; म्हणून अशा तिथीस स्नानदानादी धर्मकृत्ये सांगितली गेली आहेत. या दिवसाचा विधी असा आहे पवित्र जलात स्नान, श्रीविष्णूंची पूजा, जप, होम, दान आणि पितृतर्पण. या दिवशी अपिंडक श्राद्ध करावे आणि ते जमत नसेल, तर निदान तिलतर्पण तरी करावे.

### २ अ) उदकुंभाचे (उदककुंभाचे) दान

या दिवशी देव आणि पितर यांना उद्देशून ब्राह्मणाला उदककुंभाचे दान करावे.

### २ अ) १. महत्त्व

उदककुंभालाच 'सर्वसमावेशक स्तरावरील निर्गुण पात्र' असे संबोधले जाते.

### २ अ) २. उद्देश

**अ)** उदककुंभाचे दान करणे, म्हणजेच स्वतःच्या सर्व प्रकारच्या देहसदृश, तसेच कर्मसदृश वासनांच्या स्थूल, तसेच सूक्ष्म लहरी कुंभातील जलाला पवित्र मानून त्यात विसर्जित करणे आणि अशा प्रकारे स्वतःचा देह आसक्तीविरहित कर्मानि शुद्ध करून त्यानंतर उदककुंभायोगे या सर्व वासना पितर अन् देव यांच्या चरणी ब्राह्मणाला ग्राह्य धरून अर्पण करणे

**आ)** पितरांच्या चरणी उदककुंभ दान दिल्याने पितर मानवयोनीशी संबंधित असल्याने ते आपल्या स्थूल वासना नष्ट करतात.

**इ)** देवाचा कृपाशीर्वाद हा आपल्या प्रारब्धजन्य सूक्ष्म कर्मातील पाप नष्ट करत असल्याने सूक्ष्म कर्मजन्य वासना देवांच्या चरणी या दानाकरवी अर्पण केल्या जातात.

### २ अ) ३. उदकुंभ दानाचा मंत्र

ब्राह्मणाला उदकुंभाचे दान देतांना पुढील मंत्र म्हणावा

**एष धर्मघटो दत्तो ब्रह्मविष्णुशिवात्मकः ।**
**अस्य प्रदानात् तृप्यन्तु पितरोऽपि पितामहाः ।।**
**गन्धोदकतिलैर्मिश्रं सान्नं कुम्भं फलान्वितम् ।**
**पितृभ्यः सम्प्रदास्यामि अक्षय्यमुपतिष्ठतु ।।**
**धर्मसिन्धु**

अर्थ : ब्रह्मा, विष्णु आणि शिव ज्यात सामावले आहेत असा हा धर्मघट मी ब्राह्मणाला दान केला आहे. या दानामुळे माझे पितर आणि देवता तृप्त होवोत. गंध, उदक, तीळ, यव आणि फळे यांनी युक्त असा हा कुंभ मी पितरांसाठी देत आहे. हा कुंभ माझ्यासाठी सदा अक्षय्य (क्षय न पावणारा) ठरो.

### २ अ) ४. शास्त्र

अक्षय्य तृतीया या दिवशी ब्रह्मांडात अखंड रूपातील, तसेच एकसमान गतीजन्यता दर्शवणाऱ्या सत्त्व–रज लहरींचा प्रभाव अधिक प्रमाणात असल्याने या लहरींच्या प्रवाहायोगे पितर आणि देव यांना उद्देशून ब्राह्मणाला केलेले दान पुण्यदायी आणि मागील जन्माच्या देवाणघेवाण हिशोबाला धरून कर्म–अकर्म करणारे ठरत असल्याने या कधीही क्षय न होणाऱ्या लहरींच्या प्रभावाच्या साहाय्याने केलेले दान महत्त्वाचे ठरते.

**२) मृत्तिका पूजन :** सदोदित कृपादृष्टी ठेवणाऱ्या मृत्तिकेमुळेच आपल्याला धान्यलक्ष्मी, धनलक्ष्मी व वैभवलक्ष्मी यांची प्राप्ती होते. अक्षय्य तृतीया हा दिवस म्हणजे कृतज्ञ भाव ठेवून अशा मृत्तिकेची उपासना करण्याचा दिवस.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी काय करावे या दिवशी आपल्या जवळच्या नदीत किंवा जमल्यास गंगेत वा समुद्रात अंघोळ करावी. सकाळी पंखा, तांदूळ, मीठ, तूप, साखर, चिंच, फळ आणि वस्त्राचे दान देऊन ब्राह्मणांना दक्षिणा द्यावी. ब्राह्मण भोजन घालावे. या दिवशी सातूचे महत्त्व असून ते जरूर खायला हवेत. या दिवशी नवीन वस्त्र, शस्त्र, दागिने विकत घ्यावेत.
साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी नवीन घरात प्रवेश, नवीन वस्तू घेणे, मोठे आर्थिक व्यवहार करणे आदी शुभ कामेही केली जातात. शास्त्रांमध्ये अक्षय्य तृतीया संपादन करा.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)